RNI No. MAHBIL /2009/35530



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक २५] सोमवार, ऑगस्ट २६, २०१९/भाद्र ४, शके १९४१ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ५०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.— महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम, २०११ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . पृष्ठे १-५

दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

राजेन्द्र ग. भागवत,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २६ ऑगस्ट २०१९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

२०१४ चा महा. ७.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१८, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,– २०१४ चा महा. ७.

(१) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(क-१) "व्यथित पालकांचा गट" याचा अर्थ, या अधिनियमाखालील कोणत्याही निर्णयामुळे जे व्यथित झालेले आहेत, अशा बाधा पोहोचलेल्या इयत्तेचा किंवा, यथास्थिति, शाळेच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके एकूण पालक असलेला बालकांच्या पालकांचा गट, असा आहे; ";

(२) खंड (ञ) ऐवजी, पुढील खंड बदली दाखल करण्यात येईल :—

"(ञ) "शुल्क" याचा अर्थ, कलमे ५ आणि ६ अन्वये शुल्क म्हणून निश्चित केली असेल अशी कोणतीही रक्कम, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) आवश्यक अभ्यासक्रमासह शिकवणी शुल्क;

(दोन) सत्र शुल्क, जे प्रत्येक सत्रासाठी एका महिन्याच्या शिकवणी शुल्कापेक्षा अधिक नसेल;

(तीन) ग्रंथालय शुल्क;

(चार) प्रयोगशाळा शुल्क;

(पाच) जिमखाना शुल्क;

(सहा) तारण धन;

स्पष्टीकरण.— "तारण धन" याचा अर्थ, प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळणे किंवा त्याचे नुकसान होणे या प्रयोजनांसाठी, ग्रंथालय अनामत रक्कम म्हणून आणि क्रीडा साहित्य या करिता ठेवलेली अनामत रक्कम, असा आहे;

(सात) परीक्षा शुल्क;

(आठ) वसतिगृह शुल्क व भोजनालय शुल्क;

(नऊ) प्रवेश शुल्क.

स्पष्टीकरण १.— विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शाळेत इयत्ता पहिलीपासून सुरू होणा-या ते इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील कोणत्याही वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा आहे, त्या शाळेत त्या विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली पासून सुरू होणा-या ते इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील कोणत्याही वर्गापर्यंत प्रवेश शुल्क देण्याची आवश्यकता असणार नाही.

स्पष्टीकरण २.— प्रवेश शुल्क हे, एक महिन्याच्या शिकवणी शुल्कापेक्षा अधिक असणार नाही;

(दहा) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणत्याही अभ्यासक्रमविषयक किंवा अभ्यासांतर्गत बाबीकरिता द्यावयाची अनामत रक्कम वा रक्कम;

(अकरा) शाळेकडून पुरविण्यात येणा-या कोणत्याही अभ्यासक्रमविषयक किंवा अभ्यासांतर्गत उपक्रमासाठी किंवा सुविधांसाठी विद्यार्थ्यांकडून देय असणारी कोणतीही इतर रक्कम, यांचा समावेश होतो;".

(३) खंड (थ) वगळण्यात येईल ;

(४) खंड (भ) मध्ये " किंवा कायम विना-अनुदानित शाळा " या मजकुराऐवजी " कायम विना-अनुदानित किंवा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल:– सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ यात नवीन कलम ३क समाविष्ट करणे.

"**३-क.** (१) शाळा व्यवस्थापनाद्वारे ठरविण्यात येईल त्याप्रमाणे पालकांकडून मासिक किंवा द्विमासिक किंवा तिमाही शुल्क प्रदान करण्यात येईल : शुल्क प्रदान करणे आणि विलंबाने प्रदान करणे किंवा प्रदान न करणे यासाठी शास्ती.

परंतु, बालकांचे पालक सहामाही किंवा वार्षिक शुल्काचे प्रदान करण्यास इच्छुक असतील तर, शाळा व्यवस्थापन पालकांना त्यानुसार शुल्क प्रदान करण्याची परवानगी देईल आणि त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार त्यासाठी सवलत देता देईल.

(२) खाजगी विनाअनुदानित शाळांचे आणि कायम विनाअनुदानित शाळांचे व्यवस्थापन, शिक्षार्थ व्याजासह विलंब प्रदान शुल्क किंवा समयोत्तर प्रदान शुल्क आकारण्यासाठी हक्कदार असेल. शिक्षार्थ व्याजाचा दर, शासनाने आदेशाद्वारे ठरविल्याप्रमाणे असेल.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये ,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ४ ची सुधारणा.

(१) उपखंड (चार) मधील, "पालकांमधून दोन्ही" या मजकुराऐवजी "एक पालक व एक शिक्षक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) उपखंड (पाच) मध्ये, "प्रत्येक इयत्तेतील एक पालक व एक शिक्षक" या मजकुराऐवजी, "प्रत्येक इयत्तेतील किमान एक पालक, आणि शाळेचे कमाल तेरा पालक यास अधीन राहून प्रत्येक इयत्तेतील दोन पेक्षा अधिक नसतील इतके पालक, कमाल दहा शिक्षक यास अधीन राहून प्रत्येक इयत्तेतील एक शिक्षक आणि शाळेच्या व्यवस्थापनाचा एक प्रतिनिधी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) उपखंड (पाच) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, पालक सदस्यांची एकूण संख्या ही, नेहमी एकूण शिक्षक सदस्यांची संख्या आणि शाळा व्यवस्थापनाचे प्रतिनिधी असलेले सदस्य यांच्या एकूण संख्येपेक्षा एक या संख्येने अधिक असेल:

परंतु आणखी असे की, जर विद्याविषयक वर्षात, उपखंड (पाच) अन्वये सदस्य म्हणून कार्यकारी समितीवर कोणत्याही इयत्तेतील दोन पालकांची नियुक्ती करण्यात आली असेल तर, अशा बाबतीत पुढील एका वर्षासाठी अशा इयत्तेतून एकापेक्षा अधिक पालकांची नियुक्ती करण्यात येणार नाही.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१क) खाजगी विनाअनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळा यांच्या व्यवस्थापनास, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी, पालकांसाठी सर्व इयत्तांकरिता म्हणजे इयत्ता पहिली ते इयत्ता दहावी किंवा विभागून म्हणजे पहिला भाग समाविष्ट असलेला इयत्ता पहिली ते पाचवी आणि दुसरा भाग समाविष्ट असलेला इयत्ता सहावी ते दहावी यासाठी इयत्तानिहाय शुल्क संरचना घोषित करण्याची निवड करता येईल. जर भागनिहाय शुल्क संरचना घोषित केली असेल तर मात्र, उर्वरित भागासाठीची शुल्क संरचना, ते विद्याविषयक वर्ष सुरू होण्याच्या किमान एका वर्षाआधी घोषित करण्यात येईल. शाळेने घोषित केलेली अशी शुल्क संरचना, सर्व संबंधितांसाठी बंधनकारक असेल. शाळेचे व्यवस्थापन, सदर शुल्क संरचना, शाळेच्या सूचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावरही प्रदर्शित करील.

(१ख) पोट-कलम (१क) खालील तरतुदीनुसार शुल्क संरचना घोषित करण्याची निवड ज्या खाजगी विनाअनुदानित शाळांच्या व कायम विनाअनुदानित शाळांच्या व्यवस्थापनाने केलेली नसेल ते शाळा व्यवस्थापन मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क, अधिक त्यात उक्त शुल्काच्या पंधरा टक्क्याइतकी रक्कम यापेक्षा अधिक नसेल, इतके शाळेचे शुल्क प्रस्तावित करण्यास पात्र असेल :

परंतु, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना, कार्यकारी समितीने किंवा, यथास्थिति, विभागीय शुल्क नियामक समितीने शुल्कास मान्यता दिल्याच्या दिनांकापासून दोन वर्षानंतर शुल्क वाढवता येईल.

(१ग) शाळा व्यवस्थापनास, अकल्पित प्रसंगी ७६ टक्के पालकांहून कमी नसतील इतक्या पालकांची मान्यता घेऊन किंवा कार्यकारी समितीच्या मान्यतेने, त्याबाबतची कारणे किंवा परिस्थिती सादर करून, पोट-कलम (१क) मध्ये नमूद केलेल्या शुल्क संरचनेमध्ये तरतूद करण्यात आलेल्या शुल्कात वाढ करता येईल किंवा पोट-कलम (१ख) मध्ये तरतूद केलेल्या दरापेक्षा उच्चतर दराने किंवा पोट-कलम (१ख) च्या परंतुकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे दोन वर्षे अगोदर शुल्क प्रस्तावित करता येईल.";

(२) पोट-कलम (४) मधील, " विचारार्थ पाठविण्यात आलेली बाब प्रलंबित असताना" या मजकुराने सुरू होणा-या आणि " मुभा असेल " या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" विचारार्थ पाठविण्यात आलेली बाब प्रलंबित असताना, व्यवस्थापनास विभागीय शुल्क नियामक समितीचा अंतिम निर्णय येईपर्यंत, मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क अधिक अशा शुल्कात पंधरा टक्के वाढ एवढे शुल्क, किंवा प्रस्तावित वाढीव शुल्क, यांपैकी जे कमी असेल ते, शुल्क गोळा करता येईल.";

(३) पोट-कलम (४) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, पोट-कलम (४) अन्वये ठरविण्यात आलेले शुल्क हे, व्यवस्थापनाने पालकांकडून गोळा केलेल्या शुल्काहून अधिक असेल तर अशा बाबतीत, पालकांकडून कोणतेही शिक्षार्थ व्याज वसूल करण्यात येणार नाही.";

(४) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (५) जर,—

(क) व्यवस्थापन, कार्यकारी समितीच्या निर्णयाने व्यथित झाले असेल तर त्यास कार्यकारी समितीचा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपील दाखल करता येईल ;

(ख) कार्यकारी समितीच्या निर्णयामुळे किंवा व्यवस्थापनाने वाढविलेल्या शुल्कामुळे, पालक व्यथित झाले असतील तर, व्यथित पालकांच्या गटास, कार्यकारी समितीचा किंवा शाळा व्यवस्थापनाचा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अपील दाखल करण्यासाठी अधिकृत असणा-या प्रत्येक व्यथित पालकाने यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेल्या नमुन्यासह, असे अपील विभागीय शुल्क नियामक समितीकडे दाखल करता येईल :

परंतु, एखादे अपील किंवा निर्देशित प्रकरण वेळेच्या आत दाखल करण्यात न आल्याबद्दल पुरेशी कारणे आहेत, अशी जर विभागीय शुल्क नियामक समितीची खात्री पटली तर, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरही पण साठ दिवसांच्या आत, असे अपील किंवा निर्देशित प्रकरण, विभागीय शुल्क नियामक समितीस दाखल करून घेता येईल.".

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (६) मधील, खंड (छ) नंतर, पुढील परंतुक जादा करण्यात येईल :— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ८ ची सुधारणा.

" परंतु, खंड (छ) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा किंवा व्यवस्थापनाचा सर्वसाधारण सदस्य किंवा सल्लागार असलेली कोणतीही व्यक्ती, विभागीय शुल्क नियामक समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास अनर्ह ठरणार नाही. ".

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(१) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क-१) जर शाळेची इमारत भाड्याची असेल किंवा भाडेपट्ट्याने घेतली असेल तर, नोंदणीकृत करारानुसार किंवा भाडेपट्ट्यानुसार असलेले असे भाडे, किंवा वाजवी भाडे :

परंतु, जर असे भाडे अवाजवी असल्याचे दिसून आले तर, सिद्ध गणकानुसार किंवा बाजारभावानुसार असलेले भाडे विचारात घेण्यात येईल ; " ;

(२) खंड (ख) मध्ये, " पायाभूत सोयीसुविधा " या मजकुराऐवजी " पायाभूत सोयीसुविधांसाठीचा त्या वर्षातील खर्च " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (८) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १० ची सुधारणा.

" (९) कार्यकारी समिती किंवा व्यथित पालकांचा गट किंवा व्यवस्थापन यांच्याकडून लेखी विनंती किंवा निवेदन मिळाल्यानंतर, अपवादात्मक प्रकरणांमध्ये किंवा त्याची कारणे नमूद केल्यानंतर, विभागीय नियामक शुल्क समितीला या कलमान्वये मंजूर केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल :

परंतु, विभागीय नियामक शुल्क समिती, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश मंजूर करण्यापूर्वी कार्यकारी समितीला किंवा व्यथित पालकांच्या गटाला किंवा, यथास्थिति, व्यवस्थापनाला त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल. ".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) मधील " रकमेच्या दुप्पट " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (४) शासनास या अधिनियमान्वये खटला सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा अपराध आपसात मिटविण्यासाठीची कार्यवाहीस सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ कोणताही अधिकारी प्राधिकृत करता येईल. " .

१०. शंकानिरसनासाठी, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणा या जेथे व्यवस्थापनाने किंवा शाळेने मुख्य अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींअन्वये विद्याविषयक वर्षांमध्ये, शुल्कासाठी यापूर्वीच मान्यता घेतलेली आहे, प्रवेश प्रक्रिया किंवा त्याच्याशी संबंधित कोणतीही इतर कार्यवाही सुरू केलेली आहे तेथे, अशा व्यवस्थापनाला किंवा शाळेला लागू असणार नाहीत. शंका निरसन.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.

RNI No. MAHENG / 2009 / 35528



महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ३७] सोमवार, ऑगस्ट २६, २०१९/भाद्रपद ४, शके १९४१ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ८४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) (Amendment) Act, 2018 (Mah. Act No. XXVIII of 2019), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XXVIII OF 2019.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 26th August 2019).

An Act to amend the Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) Act, 2011.

WHEREAS it is expedient to amend the Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) Act, 2011, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India as follows :—

Mah. VII of 2014.

1. This Act may be called the Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) (Amendment) Act, 2018. Short title.

Amendment of section 2 of Mah. VII of 2014.

2. In section 2 of the Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) Act, 2011 (hereinafter referred to as "the principal Act"),– Mah. VII of 2014.

(*1*) after clause (*a*), the following clause shall be inserted, namely :—

"(*a-1*) "aggrieved parents group" means the group of parents of the children, not be less than 25 per cent of the total parents of the children of affected standard or school, as the case may be, who are aggrieved by any decision under the Act ;";

(*2*) for clause (*k*), the following clause shall be substituted, namely :—

"(*k*) "fee" means the amount, fixed as a fee under sections 5 and 6 and includes,-

(*i*) tuition fee including curriculum essential;

(*ii*) term fee, which shall not exceed one month tuition fee per term;

(*iii*) library fee;

(*iv*) laboratory fee;

(*v*) gymkhana fee ;

(*vi*) caution money.

Explanation.-"caution money" means the deposit of money for the purposes of handling or damage of laboratory instruments, library deposit and for sports instruments;

(*vii*) examination fee ;

(*viii*) hostel fee and mess charges ;

(*ix*) admission fee.

Explanation-I.- Where the student is admitted into the school having the facility to undertake education upto the tenth standard or any standard below it, starting from grade one, the student shall not be required to pay the admission fee once again.

Explanation-II.- The admission fee shall not be more than one month fee of the tuition fee ;

(*x*) deposit as security amount or amount payable for any curricular or co-curricular item as may be prescribed;

(*xi*) any other amount payable by a student towards any curricular or co-curricular activities or facilities provided by the school ;" ;

(*3*) clause (*r*) shall be deleted ;

(*4*) in clause (*x*), for the words "or permanently un-aided" the words "permanently un-aided or self-financed" shall be substituted.

Insertion of new section 3A in Mah. VII of 2014.

3. After section 3 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Payment of fee and penalty for late or non payment.

"3A. (*1*) The fee shall be paid by the parents monthly or bi-monthly or quarterly, as decided by the school management:

Provided that, if the parents of the children intends to pay the fee half-yearly or yearly, the management of the school shall allow parents to pay the fee accordingly and may at their discretion offer rebate.

(*2*) The management of the private unaided schools and permanently unaided schools shall be entitled to charge a delay payment fee or late payment fee, with penal interest. The rate of penal interest shall be such, as may be decided by the Government by order.".

4. In section 4 of the principal Act, in sub-section (*2*), in clause (*a*),– Amendment of section 4 of Mah. VII of 2014.

(*1*) in sub-clause (*iv*), for the words "Both from amongst the parents" the words "One parent and one teacher" shall be substituted;

(*2*) in sub-clause (*v*), for the words " One parent and one teacher from every Standard" the words "Minimum one parent from each standard and not more than two parents from each standard subject to maximum of thirteen parents of the school, one teacher from each standard subject to maximum of ten teachers and one representative of school management" shall be substituted;

(*3*) after sub-clause (*v*), the following provisos shall be added, namely :—

"Provided that, total number of parent members shall always exceed by one than the total teacher members and member who is representative of the school management :

Provided further that, in the academic year, if two parents are appointed from any standard on the Executive Committee, as members under sub-clause (*v*), in such cases, for next one year, not more than one parent shall be appointed from such standard.".

5. In section 6 of the principal Act,— Amendment of section 6 of Mah. VII of 2014.

(*1*) after sub-section (*1*), the following sub-sections shall be inserted, namely :—

"(*1A*) The management of private unaided schools and permanently unaided schools may choose to declare at the time of admission to the students, the standard-wise fee structure for all the standards *i.e.* from first standard to the tenth standard or in parts, that is to say first part comprising of standards first to fifth and the second part comprising of sixth to tenth standards, to the parents. If the fee structure is declared for a part, then, fee structure for remaining part shall be declared at least before one year of commencement of that academic year. Such fee structure as declared by the school shall be binding on all concerned. The management of the school shall also display the fee structure on the notice board and on the official website of the school.

(*1B*) The management of private unaided schools and permanently unaided schools who does not choose to declare the fee structure as per the provisions under sub-section (*1A*) shall be eligible to propose the fee in the school which shall not be more than previous academic year fee plus an amount of fifteen per cent. of the said fee :

Provided that, the private unaided schools and permanently unaided schools may increase the fee after two years from the date, the fee approved by the Executive Committee or Divisional Fee Regulatory Committee, as the case may be.

(*1C*) The management of the school may increase the fee provided in the fee structure as mentioned in sub-section (*1A*) or propose the fee higher than the rate as provided in sub-section (*1B*) or before two years as provided in the proviso to sub-section (*1B*), in unforeseen events, with the approval of 76 per cent.of parents or approval of the Executive Committee by furnishing reasons or circumstances thereof.";

(*2*) in sub-section (*4*), for the portion beginning with the words " During the " and ending with the words " Regulatory Committee ", the following shall be substituted, namely :—

" During the pendency of the reference, the management may, till the final decision of the Divisional Fee Regulatory Committee, collect the fee same as that of the previous academic year plus fifteen per cent. increase in such fee, or, the proposed increase fee, whichever is less.";

(*3*) after sub-section (*4*), the following proviso shall be added, namely:-

"Provided that, if the fee is decided under sub-section (*4*) is higher than the fee collected by the management from the parents, in such case, no penal interest shall be recovered from the parents.";

(*4*) for sub-section (*5*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*5*) If,–

(*a*) the management is aggrieved by the decision of the Executive Committee, it may prefer an appeal, within thirty days from the date of receipt of the decision of the Executive Committee, to the Divisional Fee Regulatory Committee;

(*b*) the parents are aggrieved by the decision of the Executive Committee or the fee increased by the management, the aggrieved parents group may prefer an appeal, alongwith a duly signed form by each aggrieved parent authorizing the filing of such appeal within thirty days from the date of receipt of the decision of the Executive Committee or the school management, to the Divisional Fee Regulatory Committee :

Provided that, the Divisional Fee Regulatory Committee may entertain such appeal or reference after the expiry of the period of thirty days, but not more than the sixty days if it is satisfied that there are sufficient reasons for not preferring an appeal or reference within time.".

Amendment of section 8 of Mah. VII of 2014.

6. In section 8 of the principal Act, in sub-section (*6*), after clause (*g*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, for the purposes of clause (*g*), any person who is ordinary member or advisor of any educational institution or management, shall not be disqualified for appointment as Chairman or Member of the Divisional Fee Regulatory Committee.".

Amendment of section 9 of Mah. VII of 2014.

7. In section 9 of the principal Act, in sub-section (*1*),

(*1*) after clause (*a*), the following clause shall be inserted, namely:-

"(*a-1*) If the school building is taken on rent or lease, the rent as per the registered agreement or lease, such rent or reasonable rent:

Provided that, if such rent found unreasonable, then the rent as per Ready Reckoner or Market Rate shall be considered;";

(*2*) in clause (*b*), for the words "the Infrastructure" the words "the expenses in that year for the Infrastructure" shall be substituted.

Amendment of section 10 of Mah. VII of 2014.

8. In section 10 of the principal Act, after sub-section (*8*), the following sub-section shall be added, namely :—

"(9) On receipt of the written request or statement, from the Executive Committee or aggrieved parents group or management, in exceptional cases and after recording reasons thereof, the Divisional Fee Regulatory Committee shall have power to review its order passed under this section :

Provided that, the Divisional Fee Regulatory Committee shall, before passing any order under this sub-section, give opportunity of being heard to the Executive Committee or aggrieved parents group or management, as the case may be.".

Amendment of section 16 of Mah. VII of 2014.

9. In section 16 of the principal Act,—

(1) in sub-section *(1)*, in clause (*a*), the word "twice" shall be deleted;

(*2*) after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :—

"(*4*) The Government may authorize any officer for the purposes of initiation of action for prosecution, or compounding of offences, under this Act.".

Removal of doubt.

10. For the removal of doubt, it is hereby declared that, the amendments made by this Act, shall not apply to the management or school, where in the academic year, the fee has already been approved, the admission process has been initiated or any other action relating thereto under the existing provisions of the principal Act prior to its amendment by this Act has been taken.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.